## : प्रकरण 4 थे :

# कम्युनिस्ट पक्षाच्या साहयकारी संघटना

## : प्रकरण चौथे :

# "कम्युनिस्ट पक्षांच्या साह्यकारी संघटना"

इचलकरंजीमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व भारतीय कम्युनिस्ट पक्ष कार्य करतात. त्या पक्षाच्या साह्यकारी संघटनाच्याद्वारे लोकशिक्षण, पक्ष कार्यकर्ते निर्माण करून आपल्या पक्षांची धोरणे लोकांच्यापर्यंत पोहचविण्याचे कार्य करतात. ह्या संघटना विविध प्रश्नांवर आंदोलने, घेराव, मोर्चे काढतात आणि समाजातील दुर्बल व्यक्तीना न्याय मिळवून देतात. लोकशाही शासनप्रणाली असलेल्या देशात विविध राजकीय पक्षांच्या साह्यकारी संघटना आहेत. उदा. काँग्रेस, भाजप, जनता दल वगैरे.

## "मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या साह्यकारी संघटना"

इचलकरंजीमध्ये मा. क. प. च्या पुढील साह्यकारी संघटना आहेत. 1) ट्रेड युनियन 2) भारताचे लोकशाहीवादी युवा फेडरेशन 3) अखिल भारतीय जनवादी महिला संघटना 4) स्टुडंड फेडरेशन ऑफ इंडिया 5) झोपडपट्टी संघटना ह्या होत.

### 1. ट्रेड युनियन :-

"कामगार वर्गाच्या नेतृत्त्वाखाली अपेक्षित क्रांती करण्यावर मा. क. प चा भर आहे."[1] त्यासाठी कामगार वर्गास संघटित करून समाजसत्तावादी क्रांतीसाठी त्यांना सज्ज करणे हा मा. क. प. प्रणीत कामगार संघटनेचा उद्देश आहे." कामगारांच्या हक्काच्या, अन्याय निवारण करण्याच्या दैनंदिन लढयाच्या माध्यमातून ही जागृती कामगार वर्गात करावी लागते. त्या दृष्टीने मा. क. प. ने आपल्या

नेतृत्वाखाली ट्रेड युनियनची स्थापना केली आहे."[2]

मे 1970 मध्ये कलकत्ता येथे मा. क. प. ने आपल्या नेतृत्त्वाखाली "सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स" या वेगळ्या कामगार संघटनेची स्थापना केली. [3] अशा तऱ्हेने देशभर सिटूला संलग्न अशा निरनिराळ्या भागात ट्रेड युनियनची स्थापना झाली. "इचलकरंजीमध्ये ट्रेड युनियन स्थापना सिट्च्या स्थापनेपूर्वी म्हणजे 1968 साली झाली. नंतरची सिट्ला संलग्न झाली. प्रारंभी या संघटनेत सदस्य संख्या कमी होती. पण सध्या 6000 पर्यंत सभासद ट्रेड युनियन मध्ये आहेत."[4]

"या ट्रेड युनियनचा उद्देश कामगाराचे आर्थिक व सामाजिक हक्क मिळविणे, त्यांचे रक्षण करणे, हा आहे. इचलकरंजीत अनेक कामगार अनेक व्यवसायात असंघटित आहेत. त्यांना ट्रेड युनियनच्या माध्यमातून संघटित करून त्यांचे हक्क व अधिकार सुरक्षित ठेवण्यासाठी सतत संघर्ष करत आहे. आणि त्यांच्या हक्कांसाठी संघर्ष करून समाजात समाजसता वादी स्थापन करणे. कामगारांच्या हाती सत्ता आल्यानंतर तेथे वर्गीय संघर्ष राहणार नाही. उत्पादनाची साधने भांडवलदारांच्या हाती आहेत ती बदलून समाजाच्या मालकीची बनविणे कामगारांची सत्ता प्रथापित करण्याचा प्रयत्न करणे, ट्रेड युनियन मार्फत दैनंदिन प्रश्नावर (समस्यावर) सतत संघर्ष केला जातो. आज सुद्धा आर्थिक हक्क व सामाजिक हक्क प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केले जातात.

इचलकरंजीतील कामगार अनेक राजकीय पक्षांच्या संघटनात अडकून विभागला आहे. इचलकरंजीत कॉंग्रेस प्रणीत इंटक व शिवसेना प्रणीत कामगार सेना या संघटनात विभागला गेला आहे. पण मा. क. प. च्या वतीने चालविण्यात येणाऱ्या ट्रेड युनियनमध्ये जास्तीत जास्त कामगार आहे.

पावरलूम क्षेत्रात ट्रेड युनियनचा मोठा सहभाग आहे. पावरलूमच्या कामगाराचे अनेक प्रश्न ट्रेड युनियनमार्फत सोडविले आहेत. त्यासाठी वेळोवेळी संघर्ष व आंदोलने करून मजूरीचा प्रश्न काही अंशी सोडविण्यात यश आले आहे. पण इचलकरंजीच्या आर्थिक नाड्या भाडंवलदार लोकांच्या हाती आहेत. त्यासाठी बड्या उद्योगाचे राष्ट्रीयकरण झाले पाहिजे.

इचलकरंजीत असंघटित क्षेत्रात जे कामगार आहेत उदा. पॉवरलूम, इंजिनिअरिंग, म्युसिपल, शेतमजूर याना संघटित किमान करून त्यांना किमान वेतन दिले जावे यासाठी संघटनेमार्फत प्रयत्न केला. किमान वेतन मिळावे यासाठी संघटित असा मोर्चा काढला. 1971 साली किमानवेतन कायदा महाराष्ट्र शासनाने केला. आणि किमान वेतन कमिटी स्थापन केली. त्या कमिटीने 140 रू. किमान वेतन द्यावे अशी शिफारस केली. त्या निर्णयाविरूद्ध संघटित विरोध केला. म्हणून वसंतदादा पाटील सरकारने 165 रू. किमान वेतन केले. पण ही वाढ तूटपूंजी होती. त्यामुळे युनियनचे समाधान झाले नाही. या दरम्यान श्री. के. एल. मलाबादे यांची किमान वेतन कमिटीवर सदस्य नेमणूक झाली. त्यांनी महाराष्ट्रातील सर्व कामगार प्रतिनिधीच्या बहूमताने निर्णय घेवून पर पाईटला एक रूपया कामगारांना द्यावा अशी शिफारस केली पण शासनाने त्या निर्णयाची अमंलबजावणी केली नाही.

किमान वेतन कामगाराला गरजेवर आधारीत द्यावे. आठ तास पाळी, ग्रॅज्यूटी, प्राव्हीडंट फंड यासारखे कायदे त्यांना मिळवून देण्यासाठी ट्रेड युनियन मार्फत प्रयत्न केला गेला आहे. आणि आजही ते हक्क कामगारांना मिळावेत म्हणून आज ही संघर्ष, आंदोलन व मागणी आहे. जोपर्यंत या मागण्या मान्य होत नाहीत तो पर्यंत ट्रेड युनियनमार्फत उपरोक्त मागणीचा पाठपुरावा केला जाणार आहे. ज्या व्यवसायाला शॉप अक्ट लागू आहे अशा कामगारासाठी युनियन 5-6 वर्षे संघटित प्रयत्न करीत

आहे. संघटनेचे अध्यक्ष कॉ. सूर्याजी साळुंखे यांनी यासाठी प्रयत्न करून वरील भूमिका मांडली आहे.

पावरलूम व्यवसायातील कामगारांना दिवाळी बोनस मिळावा. कामगाराला दिवाळीचा सण साजरा करता यावा यासाठी 20-25 वर्षापासून युनियनचा लढा दिला आणि बोनसचा हक्क मिळवून घेतला. आज कामगाराला 5% ते 12% इतका बोनस मिळतो. पण कारखानदार याला बोनस न म्हणता खुशाली असे म्हणतो. कारण जर बोनस हा प्रकार म्हटला की कायद्याच्या चाकोरीत येवू. म्हणून कारखानदार त्याला खुशाली दिली असे समजतात. तर कामगार त्याला बोनस असे म्हणतात.

औद्योगिक वसाहतीत असलेल्या मोठ्या कारखानदाराप्रमाणेच खर्चीवाल्या कारखानदाराना कामगाराना बोनस द्यावा लागतो. जो वर्षभर नफा होता तो बोनसपोटी जातो. अशा व्यथा खर्चीवाला, लहान कारखानदारांच्या आहेत.

इचलकरंजीमध्ये गुन्हेगारीप्रवृत्ती वाढत आहे. कारण ट्रेड युनियनच्या विरोधात गुन्हेगारी प्रमाण वाढत होते. संघटनेवर दहशत बसविण्यासाठी अशा दहशतवादी प्रवृत्तीच्या संघटना उदयास येत आहेत. अशा गुन्हेगारीच्या विरोधात सतत संघर्ष करावा लागतो. समाज विघातक प्रवृत्तीचे उच्चाटन व्हावे यासाठी आम्ही नेहमी सतर्क असतो.

इचलकरंजीमध्ये भ्रष्टाचाराची प्रवृत्ती वाढत आहे. जेव्हा जेव्हा अशा स्वरूपाची भ्रष्टाचाराची प्रकरणे बाहेर येतात. तेव्हा युनियन मार्फत गावचावडीवर व पंत कार्यालयावर निषेध मोर्चे काढले आहेत. यासाठी सामाजिक जागृती आवश्यक आहे. भ्रष्टाचार निमुर्लन एक संघटना बंद करू शकणार नाही. म्हणून सर्व जनतेचा पाठिंबा आवश्यक आहे."[5]

## 2) "<u>डेमोक्रटिक यूथ फेडरेशन ऑफ इंडिया</u> "

"महाराष्ट्रात 15 ते 40 वयोगटांतील तरूणांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. शिक्षण संपल्यामुळे किंवा शिक्षण अर्ध्यांवर झाल्यामुळे शाळा आणि महाविद्यालयात नसलेला वरील वयोगटातील तरूणांना संघटित करण्याच्या उद्देशाने एका वेगळ्या जनसंघटनेची योजना करण्याचे पक्षाने ठरविले. "त्यानुसार `डेमॉक्रटिक यूथ फेडरेशन ऑफ इंडिया` या संघटनेची स्थापना 1980 करण्यात आली."[6]

वरील उद्देशाने निर्माण झालेली संघटना ही स्थानिक पातळीपर्यंत कार्य करण्यासाठी व युवकांना संघटित करण्यासाठी इचलकरंजीमध्ये 1982 मध्ये स्थापन झाली. केंद्रीय राज्य पातळीवर डी. वाय. एफ. आय ची रचना व कार्य आहे तशा पद्धतीने स्थानिक पातळीपर्यंत चालते. या संघटनेचे कार्य लोकशाही तत्वानुसार चालते.

"डी. वाय. एफ. आय.` या संघटनेचे सभासद होणारी व्यक्ती या संघटनेची ध्येयधोरणे, उद्दिष्टे व कार्यक्रम स्विकारणारी, वार्षिक वर्गणी भरणारी, कोणतीही व्यक्ती या संघटनेचे सभासद होण्यास पात्र आहे."[7]

"डी. वाय . एफ. आय. या संघटनेचे घटनेत जे ध्येयधोरण, कार्यक्रम दिला आहे. तो कार्यक्रम इचलकरंजीमध्ये या संघटनेने स्विकारला आहे. त्या संघटनेची डी. वाय. एफ. आय ची इचलकरंजी शाखाने संलग्नता स्विकारली आहे.

1) युवकांच्या उन्नतीसाठी व प्रगतीसाठी तसेच लोकशाही हक्कांसाठी लढा देणे.

2) एकाधिकारशाही, जात जमातवाद व सर्व प्रकारच्या भेदभावांचा विरोध करून धर्मनिरपेक्षता व सामाजिक ऐक्यासाठी प्रयत्न करणे तसेच समाजात उच्च सामाजिक, सांस्कृतिक , नैतिक मुल्ये रूजविण्याचा प्रयत्न करणे.

3) वसाहतवाद व नववसाहतवादाच्या सर्व अविष्कारांचे निर्मूलन करून आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला मक्तेदार भांडवलशाही पाशातून मुक्त करून जनतेची लोकशाही व समाजवादी समाजव्यवस्था प्रस्थापित करण्याचा मार्ग मोकळा करण्याच्या लढयात ती सक्रिय भाग घेते.

4) बेरोजगारीविरोधी लढ्याचे संघटन व संचलन करणे आणि रोजगार मिळेपर्यंत बेरोजगारी भत्ता मिळण्यासाठी संघर्ष करणे तसेच कामाचा हक्क घटनेत मूलभूत हक्क म्हणून समाविष्ट व्हावा यासाठी प्रचार व आंदोलन करणे.

5) समाजातील निरक्षतेच्या उच्चाटनासाठी प्रौढ शिक्षणाचे वर्ग चालविणे, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे.

6) अस्पृश्यता, हुंडा पद्धती, बालविवाह, धार्मिक अंधविश्वास , सार्वजनिक जीवनातील भ्रष्टाचार या विरुद्ध लढा चालविणे तसेच नैसर्गिक आपत्ती, अपघात, रोगराई इ. प्रसंगी मदत व पूनर्वसन कार्यात सक्रिय भागीदारी करणे.

7) प्रगतशील विचारांचा चळवळीत भाग घेणे व जगातील अशा सर्व युवा संघटनांशी बंधुभावाचे संबंध

स्थापन करणे इ.

वरील सर्व ध्येयधोरणे व कार्यक्रम मान्य असणाऱ्या 15 ते 40 वयोगटांतील सर्व स्त्री पुरूषांना डी. वाय. एफ. आय मध्ये संघटित केले जाते.

या संघटनेमध्ये कोल्हापूर जिल्ह्यात 1984-90 पर्यंत 20,000 सदस्य होते. हेच कार्यकर्ते पक्षाकडे सभासद म्हणून वर्ग झाल्यामुळे सध्या 2500 पर्यंत सभासद कोल्हापूर जिल्ह्यात आहेत आणि इचलकंरजीत डी. वाय. एफ. आय.` संघटनेत 2000 सभासद आहेत. ही संघटना मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या राजकीय लढ्यामध्ये सहभागी होते.

1982 पासून आजपर्यंत युवकाच्यासाठी अनेक कार्ये केली आहेत. इचलकरंजी शहरामध्ये खेळाचे स्टेडियम व्हावे अशी मागणी प्रारंभीपासून डी. वाय. एफ. आय. करत आली आहे. आणि मागणी राजाराम स्टेडिअमच्या रूपाने पूर्ण झाली आहे. युवकासाठी संघटनेच्यावतीने लायब्ररी भाणे माळ येथे सुरू करण्यात आली. युवकाच्यासाठी `डी. वाय. एफ. आय.` संघटना विविध विषयावर चर्चा, सत्रे व्याख्याने आयोजित करते. आणि युवकाच्या समस्या दूर करण्यासाठी प्रयत्न करतो. इचलकरंजीमध्ये कामगारांच्या कामगार चाळी बांधाव्यात त्याबरोबर शहरामध्ये विभागवार बांधावीत यासाठी मोर्चे, आंदोलने डी. वाय. एफ. आय ने केली आहेत.

## "डी. वाय. एफ. आय ने विविध क्षेत्रात केलेली कार्ये"

### 1. सामाजिक कार्ये :-

डी. वाय. एफ. आय. ने इचलकरंजीतील अनेक सामाजिक प्रश्नाना हात घालून ती प्रभावीपणे सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. समाजात असलेल्या अंधश्रद्धा, कामगारामधील असलेले अज्ञान दूर करण्याचा प्रयत्न सामाजिक जनजागृतीद्वारे केला आहे. अंधश्रद्धा व जटा निमूर्लनासारखे कार्यक्रम राबवून ते यशस्वी करण्याचा प्रयत्न केला आहे.

### 2. महागाई बाबतचे धोरण :-

समाज नेहमी महागाईने त्रस्त झालेला दिसून येतो. सामान्यत: कामगाराना मूलभूत गरजा भागविण्याइतके त्यांना वेतन मिळत नाही. म्हणून डी. वाय. एफ. आय ने महागाईच्या विरोधात अनेक आंदोलने केली आहेत. जेव्हा अर्थसंकल्प जाहीर केला जातो; तेव्हा त्या अर्थ संकल्पावर चर्चा सत्रे आयोजित केली गेली आहेत. अर्थसंकल्प लोकाभिमुख असेल तर सरकारचे अभिनंदन केले जाते. पण आजपर्यंत चे अर्थ संकल्प लोकाभिमुख नसल्याने अर्थ संकल्पावर आक्षेपच घेतले गेले आहेत.

### 3. सामाजिक सुरक्षेबाबत कार्ये :-

इचलकरंजीमध्ये दहशतवादी प्रवृत्तीच्या संघटना कार्यरत होत्या. त्यामुळे शहरामध्ये अराजक अशी स्थिती होती. अशा गुंड-प्रवृत्ती असलेल्या संघटनाचा बिमोड करण्यासाठी वेळोवेळी "डी. वाय. एफ. आय." संघटनेला प्रयत्न करावा लागला आणि युवकाचा आणि डी. वाय. एफ. आय च्या

हितसंबंधाच्या विरोधात जेव्हा अशा गुंड प्रवृत्ती कार्य करीत असत तेव्हा मोर्चे, आंदोलने आणि पर्यायी संघर्ष करून दहशतवाद कायमचा बंद करण्यास संघटनेस यश मिळाले.

### 4. जातीय सलोखा निर्माण करण्याचा प्रयत्न :-

बाबरी मसिद 6 डिसेंबर 1992 साली पाडण्यात आली. आणि त्या दिवशी डॉ. बाबसाहेब आंबेडकर महानिर्वाण दिन` आहे. या दोहाचे औचित्य साधून इचलकरंजीमध्ये डी. वाय. एफ. आय.` ने जातीय सलोखा दिन पाळला. 1996 साली नागनाथ आण्णा नायकवडी यांच्या नेतृत्त्वाखाली मानवी साखळी तयार केली. त्यामध्ये `डी. वाय. एफ. आय` चे कार्यकर्ते सामील झाले होते.

### 5. महिला वर्गासाठी केलेली कार्ये :-

डी. वाय. एफ. आय. ने महिलांना त्याच्या अधिकाराची जाणीव करून देण्यासाठी विविध प्रयत्न केले आहेत. स्थानिक पातळी महिलांच्यावर अन्याय झाल्यास अन्याय दूर करण्याचा प्रयत्न संघटनेद्वारे केला आहे. इचलकरंजीमध्ये महिलांना अन्यायासंबंधी जाणीव निर्माण व्हावी यासाठी जनजागरण सप्ताह साजरा केला जातो. महिलांना सर्व क्षेत्रात 33% जागांचे आरक्षण असावे यासाठी तहसिल व प्रांत कार्यालयावर मोर्चाचे आयोजन डी. वाय. एफ. आय. ने केले.

### 6. बेरोजगार युवकासाठी केलेली कार्ये :-

बेरोजगारांना काम मिळावे यासाठी अनेक वेळा संघर्ष व आंदोलने `डी. वाय. एफ. आय.` इचलकरंजी शाखेने केली आहेत. संघटनेच्या या मागणीच्या रेट्यामुळे आज इचलकरंजी

शहरातील सुशिक्षित तरूणांना 100 रू व 300 रू मासिक बेरोजगार भत्ता दिला जात आहे. पण याची अमंलबजावणी योग्य प्रकारे होताना दिसून येत नाही.

शासनाच्या अनेक चूकीच्या धोरणांचे खरे स्वरुप युवकांना समजावून सांगणे उदा. राव सरकारने 1 कोटी तरूणांना दरवर्षी रोजगार निर्माण करण्याची घोषणा केली होती. अशी घोषणा वाजपेयी सरकारने सुद्धा केली आहे. तसेच महाराष्ट्रात 4 वर्षापूर्वी 27 लाख तरूणांना नोकरी देण्याची घोषणा केली होती. पण प्रत्यक्षात याची अमंलबजावणी झाली नाही."[8]

अशा पद्धतीने डी. वाय. एफ. आय. ही संघटना इचलकरंजीमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षांची साह्यकारी संघटना म्हणून कार्य करते आणि समाजात मार्क्सवादी तत्त्वज्ञान रूजविण्याचा प्रयत्न करते.

### 3) स्टुडंटस फेडरेशन ऑफ इंडिया :-

"इतर राज्यांच्या मानाने महाराष्ट्र राज्य हे शैक्षणिक दृष्ट्या आघाडीवर आहे असे म्हणतात. यास महाराष्ट्र शासनाचे उदारधोरण कारणीभूत आहे. मागासवर्गीयांना शिष्यवृत्त्यांच्या सवलती, शैक्षणिक संस्थाना अनुदान देणे इत्यादी बाबत इतर काही मागास राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राचे धोरण निश्चितच उदार स्वरूपाचे आहे. त्यामुळे येथे शिक्षणाचा विस्तार बराच झाला आहे. असे असले तरी ही शिक्षण व्यवस्था धनिक धार्जिणी आहे. म्हणून शिक्षण व सर्वांना काम अशा नव्या व्यवस्थेच्या मागणीसाठी व त्यासाठी करावयाच्या संघर्षासाठी 1970 मध्ये "स्टुडंटस फेडरेशन ऑफ इंडिया" या विद्यार्थी संघटनेची स्थापना झाली."[9]

एस्. एफ्. आय. च्या घटनेत नमूद केलेली ध्येयधोरणे अशी -

1. लोकशाहीवादी, पुरोगामी व शास्त्रीय शिक्षण पद्धतीसाठी आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी संघर्ष करणे.

2. स्वातंत्र्य, लोकशाही व समाजवाद या तत्त्वावर समाजाची बांधणी करणे.

3. विद्यार्थ्यांसाठी संपूर्ण लोकशाही हक्क उपलब्ध करणे.

4. सर्वांना माध्यमिक स्तरांपर्यंत शिक्षण मोफत मिळावे. वसतिगृहे, सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडाविषयक भरपूर सोयी उपलब्ध व्हाव्यात यासाठी संघर्ष करणे.

5. शिक्षण पूर्ण झाल्यावर नोकरी अथवा नोकरी मिळेपर्यंत बेरोजगार भत्ता मिळावा यासाठी संघर्ष करणे.

6. समता व धर्मनिरपेक्षता ही मूल्ये रूजविण्याचा प्रयत्न करणे.

7. सर्व लोकशाहीवादी व समाजवादी शक्तींना आणि जनवादी चळवळींना पाठिंबा देणे व त्यांची मदत घेणे.

8. जगातील ज्या शक्ती राष्ट्रीय स्वातंत्र्य व समाजवादासाठी त्यांना पाठिंबा देणे व त्यांच्याशी विश्वबंधुत्वाचे नाते जोडणे.

9. लोकशाही, धर्मनिरपेक्षता व समाजवाद या उद्दिष्टांसाठी कार्यरत असलेल्या सर्व विद्यार्थी संघटनांशी भ्रातृभावाचे संबंध प्रस्थापित करणे व मागण्यासाठी संयुक्त कृती करणे."[10]

यासाठी एस्. एफ्. आय. ने `अभ्यास व संघर्ष` हा लढ्याच्या मार्ग स्विकारलेला आहे.

"एस्. एफ्. आय." या इचलकरंजी शाखेची स्थापना 1986 साली झाली. ही विद्यार्थी संघटना मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची साह्यकारी संघटना म्हणून काम पाहते. एस्.एफ्.आय. मध्ये संपूर्ण भारतात 25 लाखाहून अधिक सभासद आहेत.

एस्. एफ्. आय. चे कामकाज लोकाशाही पद्धतीने चालते. दर दोन वर्षांनी संघटनेचे अधिवेशन होते. अधिवेशनात कार्याचा अहवाल, पुढील कार्याची दिशा इ. ठरविली जाते. तसेच नवीन कार्यकारिणी, पदाधिकारी इ. ची निवड केली जाते.

`एस्. एफ्. आय.` चा उद्देश व ध्येयधोरणे ही अखिल भारतीय स्तरावर संघटना अवलंबते. ती धोरणे इचलकरंजी शहर शाखा कार्यवाही करते. एस्.एफ्.आय. चा उद्देशच स्वातंत्र्य लोकशाही, समाजवाद हा आहे. 1947 साली भारत स्वातंत्र्य झाला. या स्वातंत्र्याचा उपयोग सर्वसामान्य व्यक्तींना झाला नाही अशी एस्. एफ्. आय. ची धारणा आहे. प्रत्येकाला संपती धारण करण्याचा अधिकार असला पाहिजे. ज्याकडे पैसा आहे असेच लोक निवडणूक लढवितात. म्हणून सर्वसामान्य लोकांना स्वातंत्र्य व सत्तेचा उपभोग घेता येत नाही.

## "एस्. एफ्. आय.ची इचलकरंजीतील विविध कार्ये"

इचलकरंजीमध्ये एस्.एफ्.आय. ची स्थापना झाली तेव्हा 250 पर्यंत सभासद होते. सध्या 1999 मध्ये सभासद संख्या 800 आहे. इचलकरंजीमध्ये 30, 000 पर्यंत विद्यार्थी संख्या आहे

आणि विविध संघटनाच्याकडे विद्यार्थी आकर्षिला गेला आहे.

इचलकरंजीच्या स्थानिक पातळीवर एस्.एफ्.आय.ने अनेक कामे केली आहेत. कॉलेज प्रवेशाच्या संबंधी जेव्हा समस्या निर्माण होतात आणि काही महाविद्यालये प्रवेशासाठी डोनेशन घेतात तेव्हा एस्. एफ्. आय. ने संघर्ष व आंदोलन करून तो प्रश्न सोडविला आहेत. व सोडवते.

महाराष्ट्र शासनाने EBC बंद करण्याचा निर्णय घेतला. तेव्हा शिक्षण मंत्र्याला घेरावा घातला आणि EBC बंद करण्याच्या आदेशास स्थगिती मिळाली. विद्यार्थ्यांच्या एस् . टी. बसेस वेळेत सुटत नाहीत. त्यावेळी आंदोलन करून वेळेवर बसेस सोडण्यास भाग पाडले. प्राध्यापकांच्या संपाला एस् .एफ्.आय. ने पाठिंबा दिला.

6 डिसेंबर हा `बचाव दिन म्हणून एस् .एफ्.आय. ने पाळला. कारण या दिवशी बाबरी मशिद पाडली. यामुळे जातीय तेढ वाढले. काही जातीयवादी संघटना अशा प्रकारे सामाजिक तणाव निर्माण करतात. इचलकरंजीत अशा प्रकारचा तणाव निर्माण होवू नये. यासाठी एस् .एफ्.आय. काम करत आहे.

विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा. त्याच्यातील सुप्त गुण विकसित व्हावेत यासाठी एस् .एफ्.आय. ने महाविद्यालयीन व माध्यमिक स्तरावंर वक्तृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धा आयोजित केल्या. अशा स्पर्धांचे आयोजन प्रत्येक वर्षी एस् .एफ्.आय. करते. साक्षरता मोहिम, पल्स पोलिओ, पोवाडे या कार्यक्रम रोटरी कल्ब ऑफ इचलकरंजीच्या व एस् .एफ्.आय. च्या संयुक्त विद्यमाने आयोजित केले गेले.

सामाजिक प्रबोधन घडवून आणण्यासाठी समाजात असलेल्या अनिष्ट प्रथा नष्ट करण्यासाठी जटा निर्मूलन, देवदासी समस्या, यावर एस् .एफ्.आय. ने जनजागृती केली. आंतराष्ट्रीय महिला दिन साजरा केला गेला."[11]

अशा रीतीने विद्यार्थ्यांच्या स्वावलंबन, शिक्षण स्वातंत्र्य, समता प्रस्थापित करण्यासाठी एस् .एफ्.आय. ने विशेष प्रयत्न केले आणि मार्क्सवादी तत्त्वज्ञान समाजातच निर्माण करण्यासाठी प्रयत्न केला.

## 4. "अखिल भारतीय जनवादी महिला संघटना"

"स्त्री-मुक्तीच्या संदर्भात बलात्कार, हुंडाबळी, कुटुंबातील स्त्रियांचे दुय्यम स्थान इत्यादी पुरूषप्रधान सामाजिक- सांस्कृतिक व्यवस्थेमुळे होणाऱ्या दडपणाबरोबरच स्त्री म्हणून होणारी दडपणूक, एक श्रमिक म्हणून होणारी दडपणूक, एक माणूस म्हणून होणारी दडपणूक असा मूलभूत पैलूंचाही विचार करावा लागतो. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने 1981 मध्ये अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेची स्थापना केली."[12]

"स्त्रियांच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व बौद्धिक विकासासाठी कार्य करणे, स्त्रियांच्या कायदेशीर हक्कांसाठी झगडणे, जातीयता, अस्पृश्यता, अंधश्रद्धा यातून स्त्रियांची मुक्तता करणे कामगार शेतमजूर व श्रमजीवी स्त्रियांच्या हक्कांसाठी, सेवा शाश्वतीसाठी व कामगारासाठी योग्य परिस्थिती निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे. ही ध्येय उद्दिष्टे अ. भा. जनवादी महिला संघटनेची अहेत.

वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी जनवादी महिला संघटनेने महाराष्ट्रात चळवळी केल्या आहेत. त्यानुसार इचलकरंजी शहरामध्ये 1984 साली महिला संघटनेची स्थापना झाली. ही अखिल भारतीय महिला कम्युनिस्ट पक्षाची साह्यकारी संघटना असून राजकीय कार्यात अग्रेसर आहे.

अ. भा. जनवादी महिला संघटनेचा कारभार लोकशाही तत्त्वानुसार चालतो. समाजात महिलाचे अनेक प्रश्न आहेत. भारतीय समाज हा पुरूषप्रधान आहे. साहजिकच स्त्रियाना गौण स्थान प्राप्त होते. स्त्रियांना सामाजिक दृष्ट्या कमी लेखले जाते. महिलांना अतोनात छळ सहन करावा लागतो. त्यांच्यावर मोठ्या प्रमाणात अन्याय होतो. हुंडाबळी सारख्या समस्याना तोंड द्यावे लागते. "[13]

अशा प्रकारचे प्रश्न निर्माण झाल्यास ते सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. आणि स्त्रियांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

## 5. झोपडपट्टी संघटना :-

"औद्योगिकरण जेथे झाले आहे तेथे कामगार वस्ती वाढते. आणि कामगारचाळी निर्माण केल्या जातात. इचलकरंजीमध्ये यंत्रमाग व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढला असून कर्नाटक व महाराष्ट्रातून अनेक लोक व्यवसायाच्या निमित्ताने इचलकरंजी येतात. त्यामुळे राहणीमानाच्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.

इचलकरंजीमध्ये कामगार झोपडपट्टी मध्ये राहतात. झोपडपट्टीची समस्या आज मोठ्या प्रमाणात आहे. झोपडपट्टीत राहणारे कामगारांच्या आरोग्याचा प्रश्न, नागरी सुविधाचा प्रश्न

निर्माण झाले आहेत. या सुविधा मिळाव्यात म्हणून अनेक वेळा संघटनेने आंदोलने केली आहेत.

झोपडपट्टीचे पूनर्वसन व्हावे आणि नव्या जागी झोपडपट्टया विस्तापित व्हाव्यात यासाठी मोर्चे काढले. याचा परिणाम म्हणून इचलनगरपालिकेने 45 एकर जागा दिली. लालनगर, आंबेडकर नगर, सहकार नगर, गोसावी गल्ली येथील झोपडपट्टीचे पूनर्वसन व्हावयाचे आहे."[14]

अशा तऱ्हेने झोपडपट्टीवासियांचे अनेक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न संघटनेने केला आहे.

## 2. भारतीय कम्युनिस्ट पक्षांच्या साह्यकारी संघटना

प्रत्येक राजकीय पक्ष आपल्या अस्तित्त्वाचे जाळे पसरविण्यासाठी निरनिराळ्या साह्यकारी संघटना निर्माण करीत असतो. तशा प्रकारे भारतीय कम्युनिस्ट पक्षाने विविध साह्यकारी संघटनाद्वारे आपले प्रभाव क्षेत्र निर्माण केले. त्या साह्यकारी संघटना पुढील प्रमाणे आहेत.

### 1. करवीर कामगार संघटना :-

"भारतीय कम्युनिस्ट पक्षाची साह्यकारी संघटना म्हणून करवीर कामगार संघ इचलकरंजीमध्ये 1988 मध्ये स्थापन करण्यात आली. त्यावेळी संघटनेकडे 122 सदस्य कार्यकर्ते होते. 1998-99 मध्ये या संघटनेकडे 311 सदस्य कार्यकर्ते आहेत. या संघटनेचे कार्य लोकशाही पद्धतीने चालते. कोणत्याही सभासदांवर निर्णय वरून लादले जात नाहीत.

इचलकरंजीतील कामगारांना हक्क मिळवून देणे आणि त्यांना हक्कांची जाणीव निर्माण

करून देणे. कामगार हा गरीबीच्या ओझ्याखाली दबला आहे. त्याची आर्थिक पिळवणूक कारखानदाराकडून होते. कारखानदार कमी पगारात जास्त काम करवून घेतो. आणि मोबदला नगण्य प्रमाणात देतो. या न्याय मागण्यासाठी करवीर संघ काम करतो.

करवीर कामगार संघाने विविध क्षेत्रात काम केले आहे. कामगारांना राहण्यासाठी सरकारने घरे बांधून द्यावीत यासाठी प्रयत्न केले आहेत आणि त्यासाठी करवीर कामगार संघाने तहसिल कार्यालय व प्रांत कार्यालयावर मोर्चा काढला होता. महाराष्ट्रात 40 लाख लोकांना घरे बांधून दिली जातील अशी घोषणा सरकारने केली होती. पण प्रत्यक्षात त्याची कार्यवाही झाली नाही. इचलकरंजीमध्ये झोपडपट्टीचे प्रश्न संघटनेने हाती घेतले होते. त्यासाठी घरे, झोपडपट्टीचे पूनर्वसनासाठी नगरपालिकेने 5000 अनुदान व 5000 कर्ज मंजूर करावयाचे पण नंतर अशाप्रकारे अनुदान देता येत नाही. अशी भुमिका नगरपालिकेने घेतली. पण संघटनेने पर्यायी जागा मिळावी यासाठी प्रयत्न केले आहेत. त्या भागात पाणी, लाईट, रस्ते यांची व्यवस्था व्हावी. त्याखेरीज पूनर्वसन केले जावू नये अशी भुमिका संघटनेने घेतली.

माथाडी कामगारांच्या धरतींवर यंत्रमागधारकाना सरकार कायदा लागू करावा यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. पण एकंदरीत कामगारांच्या न्याय मागण्याकडे दुर्लक्ष केले जाते. यंत्रमागावर काम करणाऱ्या कामगारांसाठी 8 तास पाळी, हजेरी पत्रक, प्रा. फंड, बोनस, विमा, ग्रॅज्युअटी इत्यादी कोणतेही फायदे मिळत नाही. त्याच प्रमाणे प्रोसेसमध्ये व इतर धंद्यामध्ये कंत्राटी पद्धत वाढू लागली आहे. कंत्राटी कामगाराला त्याचे कोणतचे फायदे मिळत नाहीत. त्या कामगारांना नोकरीची शाश्वती नसते. या कामगारांना सेवा सवलती मिळत नाहीत म्हणून 1-10-1996 ला मुंबई येथे विराट मोर्चा काढला. अशा

विविध मार्गांना कामगारांना न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी करवीर कामगार संघाने प्रयत्न केले आहेत.

यंत्रमाग कामगारांना किमान वेतन कायदा लागू व्हावा यासाठी प्रयत्न केला पण इचलकरंजी येथील कामगार प्रतिनिधि कामगारांकडे लक्ष न देता भांडवलदाकडे लक्ष देतो. किमान वेतन कायदा होऊन बरीच वर्षे झाली पण त्याची पूनर्रचना झाली नाही. सरकार किमान वेतन कायदा लागू करण्याबाबत टाळटाळ करत आहे.

यंत्रमाग कामगारांचे राज्यव्यापी अधिवेश झाले त्या अधिवेशनमध्ये वरील सर्व मागण्या करून त्याची अमंलबजावणी तावडतोब केली जावी असा ठराव केला गेला.

जीवनावश्यक वस्तूचे भाव सतत वाढतात पण चैनीच्या वस्तूचे भाव स्थिर राहतात. त्यामुळे सरकार सर्वसामान्यासाठी काही न करता श्रीमंत लोकांच्यासाठी कार्य, हितासंबंध जोपासते. वस्तूचे भरमसाठ दर वाढल्याने कामगारांचे थोडक्या पैशात जीणे कठीण झाले.

इचलकरंजी शहरामध्ये यंत्रमाग क्षेत्रात दलाल आहेत. हे दलाल मोठ्या प्रमाणात दलाली घेतात व आपला व्यवसाय बंद करतात. दिवाळ काढतात आणि त्यामुळे कामगार बेकार होतो. सध्या शहरात लहान कारखानदार कमी होत आहे आणि त्याऐवजी मोठे कारखानदार वाढत आहेत. लहान कामगारांनी मंदीमुळे व आर्थिक फटक्यामुळे व्यवसाय बंद केले आहेत."[5]

शहरामध्ये वाढत्या गुन्हेगारीचे प्रमाण जास्त आहे. इचलकरंजीत जातीय संघटनाकडून तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो; पण करवीर कामगार संघाने जातीय तेढ वाढू नये यासाठी

प्रयत्न केले आहेत.

## 2. ग्रामपंचायत कामगार संघटना :-

"इचलकरंजी परिसरातील शिरोळ, हातकणंगले तालुक्यातील ग्रामपंचायत कामगारांची संघटना भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या साह्याने चालविण्यात येते. ग्राम पंचायतीमध्ये जे कामगार असतात. त्याना मिळणारे वेतन, सेवाशर्ती, भविष्य निर्वाह निधी, पेन्शन याबाबत भारतीय कम्युनिस्ट पक्षाने ग्रामपंचायत कामगार संघटनेच्या वतीने आंदोलने केली आहेत.

सामान्यता ग्रामीण भागामध्ये जमीनदार व भांडवलदार, सरपंच याची हुकमत असते. ग्रामपंचायत सेवकाला काढून टाकण्याचा, त्याची नेमणूक करण्याचा अधिकार त्याला असतो. या विरुद्ध ग्रामपंचायत संघटना कामगाराच्या बाजूने राहून त्याला न्याय देण्यासाठी प्रयत्न करते.

सरकारने सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याच्या दृष्टीने पंचायत राज्य संकल्पना सुरू केली. शासकीय योजना, दिवाबतीचे काम करणारा जो कर्मचारी असतो तो पंचायत राज्य व्यवस्थेतील शेवटचा घटक होय. या कामगाराला किमान वेतन मिळावे यासाठी सरकारने 3-7-1990 रोजी ग्रामपंचयात कामगाराला किमान वेतन कायदा लागू केला. किमान वेतन द्यावयाचे कुणी याची निश्चिती केली नाही. याबाबत संघटनेची मागणी अशी आहे ग्रामपंचयात कामगार हा महाराष्ट्र शासनाचा कर्मचारी आहे. त्याच्या वेतनापोटी शासनाने अनुदान द्यावे.

त्याचा दुसरा टप्पा म्हणजे ग्रामपंचायत नोकर हा शासनाचा नोकर असा निकाल उच्च न्यायालयाने दिला आहे. सरकार हे भाडंवलशाहीचे समर्थन करणारे असल्याने या निर्णयाची

अमंलबजावणी अद्याप झालेली नाही. किमान वेतन 1990 लागू केले. त्याची अमंलबजावणी झाली नाही. त्याचे पूर्नर्निर्धारन पाच वर्षांनी करावे लागते ते केले नाही.

हातकणंगले व शिरोळ तालुक्यातील ग्रामपंचायत कामगारांना सर्व सवलती लागू करण्याचे प्रयत्न केले आहे. त्या कामगारांची सेवा पुस्तके भरली आहेत. या कामगारांनी संप करून पगार वाढ घेतली आहे. इचलकरंजीच्या पश्चिमेला असणारे हातकणंगले तालुक्यातील कबनूर ग्रामपंचायतीतील 17 कामगारांनी 1997 साली संप केला. त्यांना ग्रामपंचायतीने काढून टाकले. या प्रकरणात न्यायालयीन लढाई झाली. औद्योगिक न्यायालयाने कामगाराच्या बाजूने न्याय दिला. त्यावर ग्रामपंचयातीने उच्च न्यायालयात अपिल केले. कामगारांनी बेकायदेशीर संप केला आहे. त्यानी माफी पत्र द्यावे. पण उच्च न्यायालयाने असा निकाल दिला की ग्रामपंचयात कामगारानां कामावर घ्यावे. त्यानी माफीपत्र लिहून देण्याची आवश्यकता नाही. अशा रितीने ग्रामपंचयात कामगारांना न्याय मिळवून देण्याचे काम ग्रामपंचायत कामगार संघटनेने केले आहे. त्यांची नोकरी कायम व्हावी. इतर सरकार सेवकांना ज्या सेवा सवलती मिळतात त्या मिळाव्यात यासाठी सतत 10 वर्षे संघर्ष सुरू आहे. "[16]

**3. <u>दुध सोसायटी व क्रेडीट सोसायटी कामगार संघटना</u> :-**

"ग्रामीण भागात दूध सोसायटी व क्रेडीट सोसायटी हे राजकारणाचे अड्डे म्हणून ओळखले जातात. वेगवेगळ्या गटाच्या दूध सोसायट्या व सेवा सोसायट्या असतात. या सहकारी संस्थेत असणाऱ्या कामगारांना किमान वेतन मिळावे यासाठी प्रयतन केले आहेत.

सामान्यता ग्रामीण भागात या सेवा सोसायटीमध्ये नेमलेला कामगार हा आपल्या

राजकीय गटाचा असलेला माणूस नोकर नेमला जातो. पण त्याच्यामध्ये वर्गीय जाणीव निर्माण करून कामाच्या योग्य मोबदल्यासाठी संघर्ष करण्यास भाग पाडले आहे."[17]

अशा पद्धतीने दूध सोसायटी व क्रेडिट सोसायटीतील कामगाराना वेतन मिळवून देण्यात संघटनेने प्रयत्न केला आहे.

## 4. <u>ऑल इंडिया स्टुडंटस फेडरेशन</u> :-

"भारतीय कम्युनिस्ट पक्षाची ऑल इंडिया स्टुडंटस फेडरेशन ही साह्यकारी संघटना आहे. या विद्यार्थी संघटनेने इचलकरंजीतील शैक्षणिक क्षेत्रात वाढणारे अनिष्ट प्रकार बंद पाडले. खाजगी शिकवणी, बी.एड् . फी वाढ विरोधी आंदोलन, जातीय सलोखा प्रस्थापित करणे, राष्ट्रीय ऐक्य व एकात्मता वाढीस लावण्याचा प्रयत्न करणे.

महाविद्यालयातील ज्युनिअर प्राध्यापक मंडळीच्या न्याय मागण्यांना पाढिंबा देण्यात आला. प्राध्यापकांच्या संपामुळे व सरकारच्या अडमूठ्या धोरणामुळे विद्यार्थी व पालक यांच्यात चिंतेचे वातावरण पसरले होते. शासनाने प्राध्यापकांच्या मागण्याचा सहानुभूतीपूर्वक विचार केला नाही. तर परिक्षेवरसुद्धा प्राध्यापक बहिष्कार घालणार समजले. परिक्षा पुढे ढकलाव्या लागणार असे समजले. जर संप शासन मिटविण्याचा प्रयत्न केला नाही तर महाविद्यालय बंद पाडून उग्र आंदोलन छेडण्यात येईल असे परिपत्रक संघटनेमार्फत काढले गेले."[18]

अशा पद्धती इचलकरंजी शहराच्या शैक्षणिक समस्या सोडविण्याचा प्रयत्न ए. आय.

एस. एफ. या संघटनेने केला आहे.

5. **<u>अंगणवाडी बालवाडी संघटना</u> :-**

"एकात्मिक बाल विकास योजनांतर्गत अंगणवाडी, बालवाडीच्या मुलांना सकस आहार द्यावा. लहान बालकांचा विकास व्हावा. यासाठी अनुदान राज्य शासनास केंद्राकडून मिळते. लहान बालकाचे कुपोषण थांबावे. याचा शारीरिक व मानसिक विकास व्हावा हा उद्देश आहे.

संघटनेने ग्रामीण भागातील महिलांना नोकऱ्या घ्याव्यात. यासाठी प्रयत्न केला. स्थानिक पातळीवर राजकीय हेतूने प्रेरित काही गावात अंगणवाडी, बालवाडी सेविका भरल्या गेल्या. त्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला. आयटक ने संघर्ष करून अशा नेमणूक रद्द व्हाव्यात म्हणून आंदोलन केले आणि याचा परिणाम म्हणजे पात्र सेविका होत्या त्याना नोकरीत सामावून घेतले गेले.

शिक्षणाचा विकास, लसिकरण, महिला जागृती सर्व कामे त्यांना करावी लागतात. अंगणवाडी, बालवाडी सेविका सरकारी नोकर आहेत. त्यांना योग्य मोबदला द्यावा. यासाठी आंदोलन केले.

महाराष्ट्राच्या पातळीवर 1998 हे महिला वर्ष असल्यामुळे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना अंगणवाडी, बालवाडी सेविकांना 2000 रू देण्याची घोषणा केली पण प्रत्यक्षात अमलबजावणी झाली नाही. आयटक, एच.एम.एस., लाल संघटनांनी आंदोलने केली. सुधीर जोशी कमिटीने 1500 रू शिफारस केली पण प्रत्यक्षात अंमलबजावणी केली नाही.

संघटनेच्या आजही प्रभावी मागण्या पुढील प्रमाणे आहेत.

1) अंगणवाडी सेविकांना 1500 रू आणि मदतनीस बाईस 925 रू. पगार द्यावा.

2) अंगणवाडी सेविकांना कुटुंब कल्याणाच्या केसेस मिळविण्याची सक्ती नसावी.

3) सरकारी घोषणेनुसार दिवाळी बोनस 250 रू. मिळावा.

4) स्थानिक पदाधिकाऱ्यांद्वारा केलेल्या खोट्या तक्रारीच्या आधारे सेविकांना फसविणे बंद करावे.

5) जेथे अंगणवाडी इमारत नाही तेथे इमारत बनविण्यात यावी."[19]

अशा प्रकारे अंगणवाडी, बालवाडी सेविकांचे प्रश्न सोडविण्यासाठी अनेक प्रयत्न झालेत.

**6. <u>भारतीय महिला फेडरशेन</u> :-**

"इचलकरंजीमध्ये भारतीय महिला फेडरेशन ची स्थापना 1984 मध्ये झाली. सध्या महिला संघटनेत 23 सदस्य आहेत. या संघटनेचा कारभार लोकशाही पद्धतीने चालतो.

महिलांचे अनेक प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न भारतीय महिला संघटनेच्या इचलकरंजी शाखेने केले आहे. ही संघटना भारतीय कम्युनिस्ट पक्षाची साह्यकारी संघटना म्हणून ओळखली जाते.

महिलांच्यावर समाजात अन्याय होतो. त्यांना सामाजिक न्याय मिळत नाही. स्त्री पुरूष समा[illegible] ामुळे पुरूषाच्या वर्चस्वाखाली राहावे लागते. समाजाप्रमाणे कुटुंबामध्ये सुद्धा तिला

दुय्यम स्थान आहे. कारण भारतीय समाज व्यवस्था पुरूष प्रधान आहे.

महिलांना सामाजिक प्रतिष्ठेचे स्थान व कौटुंबिक स्वास्थ मिळावे यासाठी संघटनेने प्रयत्न केले आहेत. पक्षाने व संघटनेने स्त्रीयांना नोकरी व सर्व क्षेत्रात राखीव जागाचे समर्थन केले आहे.

इचलकरंजीमध्ये मोठ्या प्रमाणात कामगार वस्ती आहे. कामगार वर्गामध्ये व सर्वसामान्य वर्गामध्ये पैशाच्या अमिषांमुळे स्त्रीचा छळ होतो. काही ठिकाणी हुंड्यासाठी स्त्रीचा बळी घेतला जातो. अशावेळी त्या आरोपीला सक्त मजूरी व्हावी यासाठी मोर्चा काढला जातो.

महाविद्यालय, शाळामध्ये मुलींची छेडछाड काढली जाते. तेव्हा महाविद्यालय व शाळामध्ये जावून महिला दक्षता समिती निर्माण केली जाते. या संदर्भात पोलीस स्टेशनला अर्ज केला जातो."[20]

अशा प्रकारे कामगार महिला सर्वसामान्य महिलांचे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न भारतीय महिला फेडरेशनकडून केले जातात.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने साह्यकारी संघटनांच्या साह्याने पक्षांकडे लोकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला आहे. साह्यकारी संघटनाद्वारे पक्ष कार्यकर्ते निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. मा. क. प. च्या विविध संघटनांचे कार्य प्रभावीपणे चालते. पण हा पक्ष कामगार वर्ग, व कामगारीच्या समस्याएवढेच कार्य करतो. या पक्षाने सर्वसामान्य लोकांचे कार्य करणे आवश्यक आहे.

भारतीय कम्युनिस्ट पक्ष कामगारांचे प्रश्न घेवून संघर्ष करतो. या पक्षाने ग्रामीण

भागामध्ये शेतमजूर व शेतरी संघटना स्थापन केल्या आहेत. मा. क. प. पेक्षा या पक्षाचा ग्रामीण भागात विस्तार मोठा आहे.

दोन्ही पक्षांनी सामाजिक व कामगारांच्या प्रश्नांवर संघटित प्रयत्न केले तर समस्या ताबडतोब सुटण्यास मदत होईल.

## : संदर्भ :

1. प्रा. मोरे विठ्ठल , महाराष्ट्रातील राजकारण आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष , कैलास पब्लिकेशन्स 1995, पा. नं. 116

2. कॉ. मधुकर चिखले , मुलाखत , मा. क.प.

3. प्रा. मोरे विठ्ठल , महाराष्ट्रातील राजकारण आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष , कैलास पब्लिकेशन्स 1995, पा. नं. 116

4. कॉ. मधुकर चिखले , मुलाखत, मा. क.प.

5. कॉ. मधुकर चिखले , मुलाखत, मा. क. प.

6. प्रा. मोरे विठ्ठल , महाराष्ट्रातील राजकारण आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष , कैलास पब्लिकेशन्स 1995, पा. नं. 128

7. प्रा. मोरे विठ्ठल , महाराष्ट्रातील राजकारण आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष , कैलास पब्लिकेशन्स 1995, पा. नं. 128

8. कॉ. कांबळे भरमा , मुलाखत, मा. क. प.

9. प्रा. मोरे विठ्ठल , महाराष्ट्रातील राजकारण आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष , कैलास पब्लिकेशन्स 1995, पा. नं. 125

10. प्रा. मोरे विठ्ठल , महाराष्ट्रातील राजकारण आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष , कैलास पब्लिकेशन्स 1995, पा. नं. 125 , 126

11. कॉ. किरण माळी , मुलाखत, मा. क. प.

12. प्रा. मोरे विठ्ठल , महाराष्ट्रातील राजकारण आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष , कैलास पब्लिकेशन्स 1995, पा. नं. 130, 131

13. कॉ. अंबुबाई शेळके , मुलाखत, मा. क. प.

14. कॉ. शिवगोंड खोत , मुलाखत, मा. क.प.

15. कॉ. मारूती आजगेकर , मुलाखत, भा. क. प.

16. कॉ. आप्पा पाटील , मुलाखत, भा. क. प.

17. कॉ. आप्पा पाटील , मुलाखत, भा. क. प.

18. कॉ. आप्पा पाटील, मुलाखत, भा. क. प.

19. कॉ. आप्पा पाटील , मुलाखत, भा. क. प.

20. कॉ. श्रीमती लोखंडे , मुलाखत , भा. क. प.

****